स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे नामनिर्देशित
यांना शासन सेवेत वर्ग-३ व वर्ग-४
पदावर नेमणुकीसाठी वयोमर्यादेत शिथिलता

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक-सीएनएस-१०९०/३४९७/सीआर-७४/९०/१६-अ,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:- २२ जानेवारी १९९१.

पहा:- शासन परिपत्रक ज्ञापन, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीएनएस-१०६५/४६५२/जे, दिनांक १२ ऑक्टोबर १९६५.

शासन निर्णय:- स्वातंत्र्य सैनिकांना शासन सेवेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील वर्ग-३ ची पदे त्याचप्रमाणे वर्ग-४ च्या पदावर नियुक्तीसाठी शासन परिपत्रक ज्ञापन क्रमांक- सीएनएस-१०६५/४६५२/जे, दिनांक १२ ऑक्टोबर १९६५ नुसार सवलती देण्यात आल्या आहेत. या सवलती मुळत: स्वातंत्र्य सैनिकांसाठीच आहेत. परंतु वार्धक्यामुळे किंवा आजारपण इत्यादी कारणांमुळे स्वत: स्वातंत्र्य सैनिक ह्या नोकरीविषयक सवलती घेण्यात अपात्र असतील त्यावेळी त्यांच्यावर अवलंबित असलेल्या जवळच्या एका नातेवाईकास या सवलतीचा फायदा घेण्यासाठी नामनिर्देशित करता येते व अशा नामनिर्देशितांस सुध्दा स्वातंत्र्य सैनिकांसाठी असलेल्या नोकरीविषयक सवलती लागू होतात. अशा आदेशातील सवलतीमध्ये वयोमर्यादेत शिथिलता देण्याबाबत तरतूद आदेशाच्या परिच्छेद १(३) मध्ये करण्यात आलेली आहे. त्यामध्ये असे विहित करण्यात आले आहे की, ज्या व्यक्ती विहित शैक्षणिक पात्रतेची अट पूर्ण करीत असतील व अन्यथा नेमणुकीसाठी पात्र असतील परंतु विहित वयोमर्यादेत नसतील तर शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून त्यांना नेमणूक देण्याबाबत विचार करावा. प्रत्येक प्रकरणात शासनाची अशी मंजुरी मिळविण्यासाठी बराच पत्रव्यवहार होत असल्यामुळे विलंब होतो असे शासनाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे. त्यावर विचार करुन शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, स्वातंत्र्य सैनिक/ त्यांच्या नामनिर्देशिताने नेमणुकीसाठी केलेल्या अर्जाचा विचार करतांना जर तो शैक्षणिक पात्रतेची अट पूर्ण करीत असेल व त्या पदावरील नेमणुकीसाठी अन्यथा पात्र ठरत असेल, परंतु वयाधिक असेल तर त्याला त्या पदावर नेमणुकीसाठी उच्च वयोमर्यादा पाच वर्षे इतकी शिथिलता द्यावी. मागासवर्गीयांच्या बाबतीत त्यांना मिळत असलेल्या पाच वर्षे वयोमर्यादे

अतिरिक्त ही सवलत लागू असेल- ह्या निर्णयाचा
समावेश शासन परिपत्रक ज्ञापन, सामान्य प्रशासन विभाग,
क्रमांक सीएमसी-१०८५/३४०८/बे, दिनांक १२ ऑक्टोबर, १९८५
परिच्छेद १[२] मधील तरतुदींच्या जागी करण्यात आला आहे.

२. वरील वयोमर्यादेबाबतचे आदेश ह्या शासन निर्णयाच्या दिनांकापासूनच लागू राहतील.

३. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १२३१/९०/सेवा-९ दिनांक ३१ ऑक्टोबर, १९९० च्या सहमतीने काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, मूळ न्यायशाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व [illegible]
विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभाग/स्वातंत्र्य सैनिक कक्ष,
निवड नस्ती.

* पत्राने.